# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

ePaper
नवराष्ट्र
Paschim Maharashtra | 09 October 2025 | Page 2

# संशोधन स्पर्धेमुळे नवनवीन कल्पनांना चालना

**'कोयना एज्युकेशन'चे संचालक संजीव चव्हाण यांचे मत; महाविद्यालयीन अविष्कार स्पर्धा उत्साहात**

▸ पाटण (वा.) आविष्कार संशोधन स्पर्धा हे विद्यार्थ्यांसाठी चांगले व्यासपीठ आहे. संशोधन स्पर्धेमुळे नवनवीन कल्पनांना चालना मिळते या स्पर्धेमध्ये सहभागी होऊन संशोधक विद्यार्थी नवनवीन विषयावर अभ्यासपूर्ण संशोधन करून सादरीकरण करतील, असे मत कोयना एज्युकेशन सायटीचे संचालक संजीव चव्हाण यांनी व्यक्त केले. बी. डी. कॉलेजमध्ये आयोजित आविष्कार स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कोयना एज्युकेशन सोसायटीच्या बी.डी. कॉलेजमध्ये आय.क्यू.ए.सी. व आविष्कार समितीने महाविद्यालयीन स्तरावर आविष्कार संशोधन स्पर्धा २०२५ आयोजित केली होती. यावेळी प्रमुख पाहुणे व उद्‌घाटक म्हणून कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण, अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार तर कार्यक्रमाचे निमंत्रक म्हणून डॉ. जी.एस. पट्टेबहादूर व डॉ. संदीप तडाखे हे होते.

## प्रमाणपत्र देऊन सत्कार

महाविद्यालयीन आविष्कार स्पर्धेमध्ये बी.ए., बी.कॉम,बी.सी.ए, बी.एस.स्सी, एम.ए. एम., ए एससी च्या विद्यार्थ्यांनी विविध विषयावर अभ्यासपूर्ण संशोधन करून सादरीकरण केले. यशस्वी स्पर्धकांना प्रा.डॉ. एच. व्ही. काटे व मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून सत्कार करण्यात आला. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रो. डॉ. पी. जे. ऐवळे, प्रा. अनिल सुतार, डॉ. एस. एस. तडाखे प्रा. डॉ. पी. डी. कांबळे डॉ. एस. एस. कुंभार डॉ. एल. जी. गनगे यांनी काम पहिले. सूत्रसंचालन डॉ. एम. आर. सपकाळ यांनी केले. आभार डॉ. एस. एस. तडाखे यांनी केले. सदर कार्यक्रमासाठी प्रा बी. जे. रासकर, प्रा. विशाल कांबळे, प्रा. डॉ. संतोष पाटील, ग्रंथपाल अनिल पाटील यांच्यासह कोयनानगर महाविद्यालयातील प्रा. सुषमा कुंभार तसेच बी.ए., बी.कॉम. बी.एस.स्सी. चे विद्यार्थी उपस्थित होते.



## विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती वाढली पाहिजे

प्रमुख पाहुणे संजीव चव्हाण म्हणाले, विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती वाढली पाहिजे, त्यामुळे त्यांना समाजाच्या अनेक समस्यावर उत्तरे शोधण्याची सवय लागते, त्याचबरोबर जिज्ञासा वाढून संशोधन वृत्तीला चालना मिळते. स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांना मिळणारे मार्गदर्शन खूप मोलाचे असेल. अध्यक्षीय मनोगतात डॉ. एस. डी. पवार म्हणाले, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी अशा संशोधन स्पर्धा उपयुक्त ठरतात. महाविद्यालयात असे नवनवीन उपक्रम सुरु असतात तरी विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले. डॉ. जी. एस. पट्टेबहादूर यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले, विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती वाढीस लागावी, त्यांच्यामध्ये कौशल्य आणि कल्पकता निर्माण होण्यासाठी तसेच संशोधन स्पर्धेसाठी विद्यार्थी तयार व्हावेत यासाठी महाविद्यालय स्तरावर अविष्कार स्पर्धा आयोजित केली आहे.

## डॉ. जी. एस. पट्टेबहादूर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

बी. डी. कॉलेज मधील अर्थशास्त्राचे प्राध्यापक डॉ. गजानन पट्टेबहादूर यांनी वित्तीय बाजारपेठा व सेवा या पुस्तकाचे लेखन केले. हे पुस्तक राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या मान्यताप्राप्त अभ्यासक्रमानुसार बी.कॉम. भाग दोन साठी उपयुक्त आहे. या पुस्तकाचे कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण व प्राचार्य डॉ. एस.डी. पवार यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या वतीने व महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला.